

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६७ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | मंगळवार ०३/११/२०२६ । पाने- ६



झेंड्यावरून जोर्वेत दोन गटात राडा

दोन्हीकडील ४२ जणांवर गुन्हा दाखल



संगमनेर - तालुक्यातील जोर्वे गावात पुन्हा राजकीय वाद उफाळून आल्याने हे गाव चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. रविवारी (दि.१) सकाळी एका गटाने मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा झेंडा उभारल्यानंतर दुसऱ्या गटाने त्याला विरोध केल्याने दोन्ही गट आमनेसामने आल्याने जोरदार बाचाबाची व झुंज झाली त्यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी रात्री दोन्ही गटातील ४३ जणांवर कारवाई करत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविवारी सकाळी मुख्य चौकात भगवा झेंडा लावण्यावरून वाद निर्माण झाला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत हस्तक्षेप केला. त्यानंतर झेंडा आणि पोल काढून टाकण्यात आला. तसेच याठिकाणी कोणत्याही गटाला अथवा व्यक्तीला झेंडा किंवा पोल उभारता येणार नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता काशिनाथ गुंजाळ, कनिष्ठ अभियंता राहुल गुंजाळ उपस्थित होते. अनुचित प्रकार घडू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे, पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या उपस्थितीत मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, भगवा ध्वज उतरविण्यात आल्याने काही ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पोलिस हेड कॉन्स्टेबल अमित महाजन यांच्या फिर्यादीवरून खालील कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात अनेक प्रतिष्ठित नेते कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

पहिल्या गटातील आरोपींमध्ये इंद्रजित पंडीत थोरात, सुरेश जगन्नाथ थोरात, शरद नारायण थोरात, संजय निवृत्ती थोरात, राजेंद्र श्रीपत थोरात, वसंत मुरलीधर बोरकर, अक्षय गणपत दिघे, रमेश बाळासाहेब दिघे, मुकेश विठ्ठल काकड, सत्यजीत प्रकाश थोरात, हर्षल निवृत्ती काकड, विठ्ठल नानासाहेब काकड, भाऊसाहेब बाबुराव दिघे, अभिषेक शरद थोरात, बादशहा रामकृष्ण बोरकर, अमित भास्कर थोरात, पुंजा यादव दिघे, कैलास पुंडलिक इंगळे, किसन हिरामन खैरे, दिगंबर नामदेव इंगळे, राहुल रवींद्र बोरकर आणि अनिल बाळासाहेब दिघे (सर्व रा. जोर्वे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांचा समावेश आहे. तसेच दुसऱ्या गटातील गोकुळ गणपत दिघे, नितीन सखाराम दिघे, विशाल भास्कर थोरात, वसंत उर्फ सचिन रामभाऊ दिघे, शरद गणपत दिघे, बाळासाहेब विठोबा जोर्वेकर, अनिकेत भारत जोर्वेकर, मयूर नामदेव गाडेकर, बाबासाहेब शिवाजी थोरात, रवींद्र नामदेव गाडेकर, बाळासाहेब कारभारी दिघे, दिलीप विठ्ठल काकड, प्रकाश वसंत काकड, गणेश बंडोपंत काकड, नंदू कारभारी थोरात, बाळासाहेब राधू इंगळे, मच्छिंद्र आंबादास पिंपळे, जितेंद्र कैलास दिघे, नवनाथ उर्फ भावड्या गंगाधर बलसाणे आणि पंढरीनाथ दादाभाऊ बलसाणे (सर्व रा. जोर्वे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांच्या नावांचा समावेश आहे.

जिल्हा बँक निवडणूक

मतदान उत्साहात, प्रतिक्षा निकालाची



जिल्हा बँकेसाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे यांनी संगमनेर येथे तर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी राहाता ये मतदानाचा हक्क बजावला.

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत २१ संचालकपदांपैकी ११ जागा बिनविरोध झाल्यानंतर उर्वरित १० जागांसाठी आज सोमवारी मतदान पार पडले. मंगळवारी ३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय वर्चस्वाची लढाई आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. संगमनेर येथील जाणता राजा मैदानाजवळील मेहेर शाळेत मतदान पार पडले. दुपारी दोन वाजेपर्यंत सुमारे ८५ टक्के मतदान झाले होते.

या निवडणुकीत प्रमुख लढत आहे ती अकोले आमदार डॉ. किरण लहामटे विरुद्ध संजीवनी शिंदे, पारनेर खासदार नीलेश लंके विरुद्ध राहुल शिंदे, राहुरी आमदार प्राजक्त तनपुरे विरुद्ध सत्यजित कदम, कर्जत तुषार पिसाळ विरुद्ध ज्योती शिंदे, (पान३)



शिवारापासून संशोधनापर्यंतच्या योगदानाचा सन्मान

डॉ. बी. टी. पाटील, वीरेंद्र थोरात, पल्लवी बोंगे यांच्यासह नऊ जणांना कृषी विज्ञान सेवा पुरस्कार



डॉ. डी. बी. पाटील | डॉ. किशोर शिंदे | प्रा. तुषार उगले | विठ्ठल बालाजी ढेरंगे | प्रमिला बबन फंड | ब्रदिनाथ इंदापुरे | विरेंद्र थोरात | पल्लवी बोंगे-इंगोले | दीपक जाधव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शेतीला संशोधनाची जोड देत कृषी क्षेत्राच्या प्रगतीसाठी योगदान देणारे संशोधक, शेतकरी आणि कृषी ज्ञानाचा प्रसार करणाऱ्या नऊ मान्यवरांचा 'कृषी विज्ञान सेवा पुरस्कारा'ने सन्मान करण्यात येणार आहे. कारभारी (दादा) शिवार प्रतिष्ठान वतीने हे पुरस्कार दरवर्षी दिले जातात हे पुरस्काराचे पाचवे वर्ष आहे. दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता सोनोशी येथे हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

कृषी क्षेत्रातील विविधांगी योगदानाची दखल घेत पुरस्कारासाठी डॉ. बी. टी. पाटील (म. फुले कृषी विद्यापीठ, राहुरी), डॉ. किशोर शिंदे (कृषी शिक्षण परिषद, पुणे), प्रा. तुषार उगले (कीटकशास्त्रज्ञ, के. के. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक), विठ्ठल बालाजी ढेरंगे (प्रगतिशील शेतकरी, खंडेरायवाडी, संगमनेर), प्रमिला बबन फंड (प्रगतिशील शेतकरी, सारोळा अडवाई, पारनेर), बद्रिनाथ रामभाऊ इंदापुरे (प्रगतिशील शेतकरी, रांजणगाव खुरी, पैठण), वीरेंद्र थोरात (संचालक, विश्व हायटेक नर्सरी, अकोले), पल्लवी बोंगे-इंगोले (यूट्यूबर, पंढरपूर) आणि दीपक जाधव (हवामानतज्ज्ञ व कृषी सल्लागार, चांदवड) यांची निवड करण्यात आली आहे. कृषी संशोधनातून नवनवीन तंत्रज्ञान विकसित करणे, आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करणे, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे आणि समाजमाध्यमांतून कृषिविषयक ज्ञान पोहोचविणे अशा विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा या पुरस्कारांद्वारे गौरव होणार आहे. शेतीच्या विकासासाठी प्रत्यक्ष शिवारात काम करणाऱ्या हातांपासून ते संशोधन आणि ज्ञानप्रसारात योगदान देणाऱ्या व्यक्तींपर्यंत विविध स्तरांवरील कार्यकर्त्यांचा या सन्मानात समावेश आहे.

या सोहळ्यात डॉ. एल. के. गिते लिखित आणि पेन पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रकाशित 'मातीचा धनी - गोष्ट एका धाडसी बापाची' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. तसेच प्रसिद्ध कवी व व्याख्याते नितीन चंदनशिवे यांचे 'शेती, युवक आणि कुटुंब' या विषयावर व्याख्यान होणार असून, दिनदर्शिकेचेही प्रकाशन करण्यात येणार आहे. माजी कृषी व महसूलमंत्री बाळासाहेब थोरात या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.









जरांगे पाटील यांनी फोडला आणखी एक बॉम्ब

मुंबई (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. आधी एक व्हिडीओ व्हायरल करून सत्ताधाऱ्यांना घाम फोडल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आणखी एक बॉम्ब फोडला आहे. यावेळी मनोज जरांगे यांनी त्यांचा मोर्चा थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वळवला आहे. माझ्या विरोधात महिलांची टोळी तयार केली जात आहे. काही महिला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्या होत्या, असा खळबळजनक आरोप जरांगे यांनी केला आहे. त्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.मनोज जरांगे पाटील हे परभणीत आले होते. यावेळी त्यांनी मीडियाशी संवाद साधताना हा आरोप केला. माझ्या विरोधात महिलांची टोळी बनवली जात आहे. मुख्यमंत्र्यांना काही महिला भेटल्या होत्या. मुख्यमंत्र्यांनी मला पुरावे विचारले तर मी द्यायला तयार आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ओएसडीचा उल्लेख करत जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हा आरोप केला आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे.यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही नाव न घेता निशाणा साधला. आमचा माणूस तर रोज त्याच कामात आहे. आम्ही त्यांना डोक्यावर घेऊन नाचलो. त्यांचा सन्मान वाढवला. आता तोच आमच्या विरोधात कारस्थानं करत आहे, असा हल्लाच जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर नाव घेता चढवला. तुम्हाला उंचीवर नेऊन ठेवलं याचा पश्चाताप व्हायला लागला आहे. मी करणाऱ्याला नाही, करून घेणाऱ्याचा गेम वाजवतो, असा इशाराही त्यांनी दिला.

मुरासू चक्रीवादळाचा वेग वाढला ११५ किमी वेगाने वारे धडकणार!

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

'अर्नब' चक्रीवादळा'नंतर आता मुरासू चक्रीवादळाचा धोका निर्माण झाला आहे. नैऋत्य बंगालच्या उपसागरावर असलेले 'मुरासू' हे चक्रीवादळ गेल्या ६ तासांत ताशी सुमारे २० किमी वेगाने वायव्य दिशेकडे सरकले आहे. हे वादळ अधिक तीव्र होऊन आता 'तीव्र चक्रीवादळ' बनले आहे. सोमवारी (२ नोव्हेंबर) पहाटे २:३० वाजताच्या सुमारास, हे चक्रीवादळ त्याच भागात, ईशान्य दिशेला केंद्रित होते.

हे ठिकाण चेन्नई (तमिळनाडू) पासून ईशान्य-पूर्वेकडे सुमारे २६० किमी, नेल्लोर (आंध्र प्रदेश) पासून आग्नेय-पूर्वेकडे २९० किमी, मछलीपट्टणम (आंध्र प्रदेश) पासून आग्नेय-दक्षिणेकडे ३२० किमी, कावली (आंध्र प्रदेश) पासून आग्नेय-पूर्वेकडे ३१० किमी, ओंगोले (आंध्र प्रदेश) पासून आग्नेय-दक्षिणेकडे ३३० किमी आणि विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) पासून दक्षिणेकडे ४७० किमी अंतरावर स्थित आहे.हे वादळ वायव्य दिशेने पुढे जाणे अपेक्षित असून, २ नोव्हेंबर २०२६ रोजी मध्यरात्री (२३:३०) ते ३ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे (०४:००) या दरम्यान ओंगोल परिसराजवळ पोहोचण्याची शक्यता आहे. ओंगोल ओलांडल्यानंतर, हे वादळ नेल्लोर आणि नरसापूर दरम्यान दक्षिण आंध्र प्रदेश किनारपट्टी ओलांडण्याची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी १०० ते ११५ किमी इतका असेल आणि वाऱ्याचे झोत ताशी १२० किमीपर्यंत पोहोचू शकतात.चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर चेन्नईतील सर्व शाळांना सोमवारसाठी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवरील भागांसह रायलसीमा परिसरात २ आणि ३ नोव्हेंबर रोजी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. तसेच उत्तर तमिळनाडूच्या काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस होऊ शकतो.

FDA मध्ये मुंढे विरुद्ध झिरवळ? कारवाईच्या स्थगितीने चर्चांना उधाण



मुंबई - एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे राज्यभरात कारवाई करत आहेत. तुकाराम मुंढे यांनी एफडीएचा कारभार आपल्या हातात घेतल्यापासून कारवाईचा मोठा दणका सुरू आहे. सर्वसामान्य लोक तुकाराम मुंढे यांचे कौतुक करत आहेत. पण काही लोकांकरिता तुकाराम मुंढे अडचण बनले आहेत. कोणाही असो किंवा कोणाचीही कंपनी असो तक्रार आली की, तुकाराम मुंढे यांच्याकडून कारवाई केली जाते. तुकाराम मुंढे यांनी एफडीएमधून बदली होणार असल्याची जोरदार चर्चा रंगताना दिसली. राजस्थानला मुंढेंची बदली होणार असल्याचे मेसेज व्हायरल झाली. तुकाराम मुंढे यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले की, माझी राज्याबाहेर बदली होऊ शकत नाही. तुकाराम मुंढे यांच्यामुळे गुळातील रंग उडावा. जिलेबीचाही खरा रंग दिसत असून तशी विक्री केली जात आहे. अनेक खाद्यपदार्थांमध्ये होणारी भेसळ त्यांनी रोखली आहे.त्यातच आता तुकाराम मुंढे यांनी केलेली मोठी कारवाई पाण्यात गेल्याचे दिसत आहे. पुण्यातील रांजणगाव परिसरातील मिथेनॉल कंपनीवर तुकाराम मुंढे यांच्या विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. मात्र, या कारवाईला स्थगिती देण्यात आली. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी एफडीएने केलेल्या कारवाईला स्थगिती दिली आहे.पुण्यातील विषारी दारू प्रकरणानंतर रांजणगावच्या मिथेनॉल कंपनीवर तुकाराम मुंडे यांनी मोठी कारवाई केली. पुण्यातील विषारी दारू प्रकरणात काही लोकांचा जीव गेला. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. मात्र, त्याच कारवाईला मंत्री झिरवाळ यांनी स्थगिती दिली.

शिक्षण विभागात २६० कोटींचा महाघोटाळा दीड हजार बोगस शालार्थ आयडी उघड



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात क्षेत्राला हादरवून सोडणाऱ्या शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती दिवसेंदिवस अधिकच वाढत चालली आहे. आता थेट २०१२ ते २०१६ च्या कालावधीत सुमारे दीड हजार बोगस शालार्थ आयडी जनरेट करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियमबाह्य भरती करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार एसआयटीच्या तपासात उघड झाला. या महाघोटाळ्यामुळे राज्य शासनाच्या तिजोरीवर तब्बल १०० कोटींचा दरोडा पडल्याचे निष्पन्न झाले असून नाशिकरोड पोलिस ठाण्यात लवकरच स्वतंत्र गुन्हा दाखल करण्याची तयारी सुरू आहे. नाशिकरोड पोलिस ठाण्यात दाखल २ गुन्ह्यांत तब्बल १६० कोटींचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर यात आणखी १०० कोटींची भर पडल्याने अपहाराचा आकडा तब्बल २६० कोटींच्या वर जाणार आहे.

यापूर्वी नाशिकरोड पोलिस ठाण्यात दाखल दोन गुन्ह्यांतील संशयित शिक्षक, मुख्याध्यापकांची एसआयटीने कसून चौकशी केली. त्यांच्या जबानीतून व चौकशीतून या आंतरजिल्हा रॅकेटचे पाळेमुळे समोर आली. या धक्कादायक खुलाशाची तत्काळ दखल घेत शिक्षण विभागाच्या विविध कार्यालयांवर छापे टाकण्यात आले. संशयित शाळांमधील मूळ कागदपत्रे, भरती प्रक्रिया, फाईल्स, आणि आवक-जावक नोंदी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. या कागदपत्रांची फॉरेन्सिक व सखोल तपासणीत कोटचवधींच्या आर्थिक गैरव्यवहाराचे धागेदोरे उघड झाले आहेत.

जनतेने परिवर्तन घडविले; आता संगमनेरचा चेहरामोहरा बदलणार - आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुका म्हणजे काही जणांची जहागीरदारीच झाली होती. जमिनीचा सातबारा उतारा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या नावावर असला, तरी प्रत्यक्ष मालकी दुसऱ्यांची असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, तालुक्यातील जनतेने परिवर्तन घडवून आणत मला काम करण्याची संधी दिली आहे, असे सांगत आमदार अमोल खताळ यांनी विरोधकांवर निशाणा साधला.



तालुक्यातील पिंपळे येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे ज्येष्ठ नेते नामदेव चकोर जिल्हा संघटक विठ्ठलराव घोरपडे तालुका प्रमुख राजेंद्र सोनवणे वैद्यकीय सेल जिल्हाप्रमुख डॉ संतोष डांगे भाजपचे हरिश्चंद्र चकोर गणेश सानप सौरभ देशमुख सुशील शेवाळे अमोल आंधळे अमोल चकोर आकाश चकोर सुधीर घुगे कासिम मुजावर सार्थक शेवाळे शिवसेना शाखाप्रमुख संकेत राठी उपशाखा प्रमुख हरिभाऊ ढोणे कार्याध्यक्ष बाळासाहेब चकोर रविराज चकोर अंकुश चकोर सचिव लहानु कळस्कर रघुनाथ कोटकर मच्छिंद्र कोटकर संघटक विठ्ठल कोटकर अर्जुन कोटकर विराज चकोर खजिनदार खंडू वाघ यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

आमदार खताळ पाटील म्हणाले की सर्वसामान्य जनतेच्या आशीर्वादामुळेच आपण आमदार झालो आहोत. निवडणुका असोत अथवा नसोत, जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांचे प्रश्न सोडविणे हेच आपले कर्तव्य आहे. सामान्य कुटुंबातून पुढे आलेला कार्यकर्ता म्हणून मी जनतेच्या प्रश्नांची जाण ठेवून काम करीत आहे. माझ्याकडे कोणती पदवी आहे, यापेक्षा मी जनतेसाठी काय करतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. माझी नियत स्वच्छ आहे. मला माझ्या कुटुंबातील कोणालाही ठेकेदार बनवायचे नाही किंवा मुलाला राजकारणात आणायचे नाही. या तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने दिलेले प्रेम आणि विश्वास हीच माझी खरी संपत्ती आहे.

घरकुल योजनांसाठी जागेअभावी अडचणी येत असतील, तर अशा प्रकरणांमध्ये पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी आगामी हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करून पाठपुरावा करणार आहे. मी सत्ताधारी पक्षाचा आमदार असलो, तरी जनतेच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्यास मागेपुढे पाहणार नाही. संगमनेरच्या जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक तेथे सरकारकडे पाठपुरावा करू, प्रसंगी आंदोलनही करू. माझ्यासाठी आमदारकी ही पदाची प्रतिष्ठा मिरविण्याचे साधन नसून जनतेची सेवा करण्याची जबाबदारी आहे, असेही आमदार खताळ यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश चकोर यांनी केले. यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते ताराबाई माळी यांना साडी, तर युवराज माळी आणि पूनम माळी यांना पोशाख प्रदान करण्यात आले. प्रशांत कर्पे यांनी केले, तर खंडू वाघ यांनी आभार मानले.

दुष्काळात सत्काराऐवजी गरजूंना मदतीचा हात!

दुष्काळी परिस्थितीत शेतकरी व गरजूंना मदत करण्याच्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनानुसार आमदार अमोल खताळ यांनी सत्काराऐवजी गरजूंना मदत करण्याचे आवाहन केले. त्यानुसार पिंपळे शिवसेना शाखेच्या वतीने गरीब कुटुंबांना दिवाळी शिधा वाटप करण्यात आला. तसेच अपघातात आई–वडील गमावलेल्या युवराज व पूनम माळी यांना नवीन कपडे, तर ताराबाई माळी यांना साडी देऊन सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

सैन्यदलात नोकरीचे आमिष; १० तरुणांना १ कोटी ४ लाखांचा गंडा!

बनावट नियुक्तीपत्रे आणि निवडीचे ई-मेल पाठवून फसवणूक; आरोपी अटकेत, साथीदार फरार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : भारतीय सैन्यदलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगून दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या तरुणांच्या स्वप्नांचा अक्षरशः बाजार मांडल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगर जिल्ह्यात उघडकीस आला आहे. सैन्यदलात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत बनावट नियुक्तीपत्रे आणि निवडीचे ई-मेल पाठवून तब्बल १० तरुणांची १ कोटी ४ लाख ३९ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात समोर आले आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित गणेश कारभारी थोपटे (रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) याला अटक करण्यात आली असून, त्याचा साथीदार अक्षय उत्तम हरणे (रा. नांदेड) अद्याप पसार आहे. सैन्यदलात प्रत्यक्ष भरती नसतानाही गणवेश, बनावट ओळखपत्रे, सोशल मीडियावरील प्रसिद्धी आणि बनावट नियुक्तीपत्रांच्या माध्यमातून सैन्यदलातील अधिकारी असल्याचा आभास निर्माण करून तरुणांना जाळ्यात ओढण्यात आल्याने या प्रकरणाने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

भरतीच्या स्वप्नांचा घेतला गैरफायदा

भारतीय सैन्यदलात भरती होण्यासाठी तरुणांना कठोर शारीरिक मेहनत, मैदानी चाचणी, लेखी परीक्षा आणि वैद्यकीय तपासणी अशा अनेक आव्हानात्मक टप्प्यांतून जावे लागते. देशसेवेची संधी मिळविण्यासाठी अनेक तरुण वर्षानुवर्षे सराव करतात. मात्र, याच तरुणांच्या देशसेवेच्या आकांक्षेचा गैरफायदा घेत संशयितांनी पैशांच्या बदल्यात सैन्यदलात नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखविले.

सैन्यदलात ओळखी असल्याचा दावा करणे, सुरुवातीला विश्वास संपादन करणे, त्यानंतर लाखो रुपयांची मागणी करणे आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे निवड झाल्याचे भासविणे, अशी संशयितांची कार्यपद्धती तपासात समोर आली आहे. सैन्यदलाच्या अधिकृत भरती प्रक्रियेबाबत पुरेशी माहिती नसलेल्या तरुणांना या बनावाचा फटका बसला. या फसवणुकीचा धागा पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील एका तरुणाच्या तक्रारीतून समोर आला. भाळवणी येथील तरुण आणि पाडळी कान्हूर येथील त्याच्या मित्राने सैन्यदलात भरती होण्याच्या उद्देशाने गणेश थोपटे आणि अक्षय हरणे यांच्याशी संपर्क साधला होता. सैन्यदलात नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत संशयितांनी या दोघांकडून २३ लाख ३९ हजार रुपये उकळले.

पैसे घेतल्यानंतर या तरुणांना सैन्यदलात निवड झाल्याचे भासविणारी बनावट नियुक्तीपत्रे आणि निवडीचे ई-मेल पाठविण्यात आले. अधिकृत भरती प्रक्रिया पूर्ण झालेली नसतानाही कागदपत्रांच्या आधारे त्यांना नोकरी मिळाल्याचा विश्वास देण्यात आला. काही काळ आपण सैन्यदलात भरती झाल्याच्या आनंदात असलेल्या या तरुणांना नियुक्तीपत्रांमधील आणि निवड प्रक्रियेतील संशयास्पद बाबी समोर आल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ●मर्चेंट नेव्हीतील अनुभवाचा वापर करून विश्वास संपादन



मुख्य संशयित गणेश थोपटे हा यापूर्वी मर्चेंट नेव्हीमध्ये नोकरीला होता. या नोकरीच्या निमित्ताने त्याने विविध देशांचा प्रवास केला होता. मर्चेंट नेव्हीतील कामानंतर त्याने स्वतःची भारतीय सैन्यदलात निवड झाल्याचा बनाव सुरू केल्याचे समोर आले आहे.

सैन्यदलात भरती झाल्याचे दर्शविणारे फ्लेक्स बोर्ड, गणवेश, बनावट ओळखपत्रे आणि सोशल मीडियावरील प्रसिद्धी यांचा वापर करून त्याने स्वतःची प्रतिमा सैन्यदलातील कर्मचारी अशी निर्माण केली. त्याच्या संपर्कात येणाऱ्या तरुणांना तो प्रत्यक्ष सैन्यदलात कार्यरत असल्याचा समज होत असे. या विश्वासाचा फायदा घेत त्याने अनेक तरुणांकडून सैन्यदलात भरती करून देण्याच्या नावाखाली लाखो रुपये घेतल्याचा आरोप आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, पाथर्डी आणि नेवासा तालुक्यांतील तरुणांचीही या प्रकरणात फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. आतापर्यंत सुमारे १० तरुणांची एकूण १ कोटी ४ लाख ३९ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासातून पुढे आली आहे. गणेश थोपटे याला अटक करण्यात आली असून, तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. दुसरा संशयित अक्षय हरणे फरार असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.

सैन्यदलात भरती होण्यासाठी तरुणांनी मैदानावर घाम गाळावा, शारीरिक आणि मानसिक क्षमता सिद्ध करावी, ही खरी निवडीची प्रक्रिया आहे. मात्र, शॉर्टकटच्या मोहापायी आणि पैशांच्या जोरावर नोकरी मिळविण्याच्या अपेक्षेने काही तरुण फसवणूक करणाऱ्यांच्या जाळ्यात अडकत असल्याचे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे.

देशसेवेचे स्वप्न दाखवून लाखो रुपये उकळणाऱ्या अशा प्रवृत्तींमुळे तरुणांचे आर्थिक नुकसान तर होतेच, शिवाय त्यांच्या आयुष्यभर जपलेल्या स्वप्नांनाही मोठा धक्का बसतो. सैन्यदलात भरती करून देण्याच्या नावाखाली कोणीही पैसे मागितल्यास तरुणांनी सावध राहावे.

अकोले तालुक्यात दोडक्याच्या पिकाआड गांजाची लागवड!

१५ लाख ३६ हजारांचा गांजा जप्त, आरोपीला अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - शेतीतील पिकाच्या आड गांजाची लागवड करून त्याची जोपासना केल्याचा धक्कादायक प्रकार अकोले तालुक्यातील वाशेरे शिवारात उघडकीस आला आहे. दोडक्याच्या पिकामध्ये गांजाची झाडे लावून त्यांचे संवर्धन केले जात असल्याचे पोलिसांच्या कारवाईत निष्पन्न झाले. अकोले पोलिसांनी संबंधित शेतावर छापा टाकून तब्बल १५ लाख ३६ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी विजय रघुनाथ गजे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

वाशेरे शिवारातील एका शेतात दोडक्याचे पीक घेण्यात आले होते. मात्र, या पिकाच्या आड गांजाची झाडे लावून त्यांची काळजी घेतली जात असल्याची गोपनीय माहिती अकोले पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने संबंधित शेतात धडक देत छापा टाकला.



छाप्यादरम्यान दोडक्याच्या पिकामध्ये गांजाची झाडे लावून त्यांची जोपासना केली जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून गांजाची झाडे तसेच हिरवा गांजाचा पाला असा एकूण १५ लाख ३६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. शेतीतील नियमित पिकाचा आडोसा घेऊन अमली पदार्थांची लागवड केली जात असल्याने या प्रकाराने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी विजय रघुनाथ गजे याच्याविरुद्ध संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी त्याला अटक केली आहे. आरोपीला अकोले न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पुढील तपासासाठी चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

या कारवाईत पोलीस हवालदार रविंद्र वाकचौरे, पोलीस शिपाई अविनाश गोडगे, तोरडकी, सुहास गोरे, महेंद्र गुंजाळ, मनोहर मोरे आणि गायकवाड यांनी सहभाग घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप हजारे करीत आहेत. शेतीच्या आड अमली पदार्थांची लागवड करण्याचा प्रकार उघडकीस आल्याने अकोले तालुक्यात अवैध गांजा लागवडीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायात गुंतलेल्यांचे धाबे दणाणले आहेत.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस

दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



दुष्काळी परिस्थितीचा पशुसंवर्धन आयुक्तांकडून आढावा

चारा व पाणी नियोजनासाठी डॉ. किरण पाटील यांचा अहिल्यानगर जिल्हा दौरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संरक्षण, चारा व पाणी उपलब्धता आणि दुग्धव्यवसायाच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी २९ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान अहिल्यानगर जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात विविध तालुक्यांतील दूध संघ, गोशाळा, पशुखाद्य उद्योग आणि पशुपालकांशी संवाद साधून चारा टंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



संगमनेर तालुक्यातील राजहंस दूध संघ व जीवदया गोशाळेला भेट देऊन व्यवस्थापन आणि चारा संवर्धन उपक्रमांची माहिती घेण्यात आली. तसेच कोपरगाव तालुक्यातील गोदावरी खोरे दूध संघ आणि वळूमाता प्रक्षेत्राची पाहणी करून दुग्धव्यवसाय व पशुधनासाठी उपलब्ध सुविधांचा आढावा घेण्यात आला.

श्रीरामपूर तालुक्यातील निमगाव खैरी येथे निकृष्ट सुक्या चाऱ्याची पौष्टिकता वाढविण्यासाठी युरिया, गूळ व मीठ यांच्या योग्य वापराचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच मुरघास निर्मिती व पुरवठ्याबाबत -सीळपर्शीळली कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. शेवगाव तालुक्यातील श्रीकृष्ण गोशाळेतही चारा सकस करण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. पाथर्डी तालुक्यातील खरवंडी येथे पशुपालकांशी संवाद साधून चारा व पाणीटंचाईची परिस्थिती जाणून घेण्यात आली. चारा आणि उसाचे दर कमी असताना मुरघास निर्मितीचे नियोजन करावे, पशुपालकांनी आपले मूल्यवान पशुधन विकू नये, असे आवाहन आयुक्तांनी केले. स्थानिक पातळीवर चारा डेपो सुरू करण्याबाबतही निर्देश देण्यात आले.

जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथील गांगेय गोशाळा आणि चौंडी येथे भेट देऊन पशुपालक व ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. त्यानंतर जिल्हास्तरीय आढावा बैठकीत पशुधनाची स्थिती, चारा-पाणी उपलब्धता आणि आगामी नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

३१ ऑक्टोबर रोजी कामरगाव येथे पाहणी केल्यानंतर पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसी येथील जाफा पशुखाद्य कंपनीला भेट देऊन पशुखाद्य निर्मिती व गुणवत्ता तपासणी प्रक्रियेची माहिती घेण्यात आली. तसेच रांजणगाव मशीद येथील ज्ञानेश्वरी गोपालन संस्थेतील मुरघास निर्मिती, गोबर गॅस आणि इतर उपक्रमांची पाहणी करण्यात आली.

दौऱ्यादरम्यान चारा बियाणे वाटप, मुरघास निर्मिती, निकृष्ट चारा सकस करणे, स्थानिक चारा डेपो सुरू करणे आणि पाण्याचे नियोजन यावर विशेष भर देण्यात आला. टंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी उपलब्ध संसाधनांचा वेळीच वापर करून पशुधनासाठी चारा व पाण्याची पूर्वतयारी करावी, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले. या दौऱ्यात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, सहाय्यक आयुक्त डॉ. दशरथ दिघे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मोंदींना सोडणार नाही खटले भरू - खा. राऊत

मुंबई (वृत्तसंस्था)

भाजपने महाराष्ट्राची चिंता करू नये. त्यांनी जर खरोखरच महाराष्ट्राची चिंता केली असती, तर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली शिवसेना फोडली नसती, असा जोरदार घणाघात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. चलो दिल्ली रॅलीच्या यशानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि निवडणूक आयोगावर जोरदार निशाणा साधला.

महाराष्ट्रातील नेत्यांना रामलीला मैदानावरील सभेत बोलण्याची संधी मिळाली नाही, या प्रश्नावर स्पष्टीकरण देताना संजय राऊत म्हणाले की, रामलीला मैदानावर कार्यकर्त्यांची गर्दी प्रचंड वाढली होती. रेटा वाढल्यामुळे गर्दी थेट स्टेजपर्यंत सरकत आली होती. लोक सकाळी ८ वाजेपासून येऊन बसले होते. त्यामुळे आम्ही के. सी. वेणुगोपाल यांना राहुल गांधींचे भाषण सुरू करण्याची विनंती केली, जेणेकरून सभा वेळेत संपेल.संजय राऊत म्हणाले की, देशातील जनता आता नरेंद्र मोदींच्या विरोधात उभी राहिली आहे.

भूतानमध्ये प्रकाशन, सानपाड्यात गौरव!

'झेप' पुस्तकाचा प्रेरणादायी प्रवास



सानपाडा : निवृत्त माहिती संचालक तथा 'न्यूज स्टोरी टुडे'चे संपादक श्री. देवेंद्र भुजबळ यांनी लिहिलेल्या व संपादित केलेल्या 'झेप' या पुस्तकाचे गेल्या महिन्यात भूतान येथे प्रकाशन झाले. या पुस्तकात सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाशी संबंधित मान्यवरांच्या प्रेरणादायी जीवनकथांचा समावेश करण्यात आला आहे. या पुस्तकाच्या निर्मितीतील योगदानाबद्दल लेखक, संपादक आणि पुस्तकातील व्यक्तिमत्त्वांचा सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघातर्फे नुकत्याच आयोजित आनंद मेळाव्यात विशेष सन्मान करण्यात आला.

'झेप' या पुस्तकात फेडरेशन ऑफ सीनियर सिटिझन्स ऑर्गनायझेशन ऑफ महाराष्ट्र (फेसकॉम)चे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, राम काजरोलकर, मारुती नाना कदम, जे. पी. देसाई आणि सौ. अलका भुजबळ यांच्या जीवनप्रवासाचा वेध घेण्यात आला आहे. तसेच पुस्तकाच्या लेखन व निर्मिती प्रक्रियेत योगदान देणारे सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री. मारुती विश्वासराव, संपादक श्री. देवेंद्र भुजबळ आणि ग्राफिक डिझायनर श्री. शैलेश कदम यांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी 'न्यूज स्टोरी टुडे'च्या प्रकाशिका सौ. अलका भुजबळ यांनी प्रकाशन संस्थेच्या तीन वर्षांतील वाटचालीची माहिती दिली. त्या म्हणाल्या की, गेल्या तीन वर्षांत न्यूज स्टोरी पब्लिकेशनच्या माध्यमातून एकूण २५ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले आहे. यामध्ये सात यशकथा संग्रह, सहा आत्मचरित्रे, चार कवितासंग्रह, प्रत्येकी एक कथासंग्रह, कादंबरी, इंग्रजी नाटक, व्यक्तिचित्रण संग्रह आणि संकीर्ण विषयांवरील पुस्तकांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, यातील तीन पुस्तके परदेशस्थ लेखिकांची आहेत. 'झेप' हे न्यूज स्टोरी पब्लिकेशनचे रौप्यमहोत्सवी म्हणजेच २५ वे पुस्तक ठरले आहे.

साहित्य, सामाजिक कार्य आणि ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभवविश्वाला लेखनाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा न्यूज स्टोरी पब्लिकेशनचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी न्यूज स्टोरी टुडे आणि न्यूज स्टोरी पब्लिकेशनचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील साहित्यिक व प्रकाशन वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या आनंद मेळाव्याला सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्व पदाधिकारी, महिला व पुरुष ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्यावसायिक गॅस सिलिंडर महागला



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

:दिवाळीच्या तोंडावर हॉटेल, रेस्टॉरंट आणि व्यावसायिक आस्थापनांना महागाईचा आणखी एक फटका बसला आहे. तेल कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात वाढ केली आहे. आता व्यावसायिक प्रतिसिलिंडरमागे दिल्लीत १० रुपये, मुंबईत १० रु. ५० पैसे, कोलकात्यात १७ रुपये तर चेन्नईत ११ रु. ५० पैसे जादा मोजावे लागणार आहेत. ही दरवाढ १ नोव्हेंबरपासून लागू झाली असून दिल्लीत व्यावसायिक सिलिंडरचा दर २,८२० रुपयांवर पोहोचला आहे.

दरम्यान घरगुती सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. गेल्या तीन महिन्यांत व्यावसायिक गॅसच्या किमतीत सातत्याने वाढ झाली आहे. या दरवाढीचा परिणाम हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या खाद्यपदार्थांच्या किमतींवर होण्याची शक्यता आहे. ताज्या सर्वाधिक दरवाढ वाढीनुसार, कोलकात्यात, तर मुंबईत सर्वात कमी वाढ मुंबईत झाली आहे. विमान कंपन्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या एटीएफच्या दरात प्रतिलिटर एक रुपया ३७ पैशांची वाढ झाली आहे. त्यामुळे दिल्लीत एटीएफचा दर १३७ रुपये १२ पैशांवरून १३८ रुपये ५० पैशांवर पोहोचला आहे.

राष्ट्रवादीत पुन्हा राजकीय भूकंप?

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षातील बड्या नेत्यांनी वरिष्ठ नेतृत्वाला धक्का देत राष्ट्रवादीच्या बड्या नेत्यांनी थेट दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची बंद दाराआड भेट घेतली आहे. या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीतून पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे आणि हसन मुश्रीफ या ६ ज्येष्ठ नेत्यांच्या दिल्लीतील या गुप्त बैठकीमुळे पुन्हा एकदा अर्थमंत्रिपद आणि विलीनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला आहे. या बैठकीचा फोटो समोर येताच राजकीय गोटात तर्कवितर्कांना उधाण आले असून, महाराष्ट्राच्या सत्तेत आणि महायुतीच्या अंतर्गत समीकरणांमध्ये पुन्हा एकदा मोठा राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विधानपरिषद निकालानंतर राष्ट्रवादीमध्ये सर्व काही सुरळीत नसल्याचे चित्र गेल्या काही दिवसांपासून दिसत होते. रविवारी रात्री उशिरा दिल्लीत घडलेल्या घडामोडींनी त्यावर शिक्कामोर्तब केले.`.

डॉ. कांचन सहाणे यांचा प्रेरणादायी प्रवास

नवदुर्गा नारी सन्मान २०२६ पुरस्काराने सन्मानित

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : ग्रामीण भागातील मातीतून शिक्षणाची वाट धरत, जिद्द आणि मेहनतीच्या बळावर दंतचिकित्सा क्षेत्रात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या डॉ. कांचन कैलास सहाणे-शिंदे यांचा प्रवास अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. संगमनेर तालुक्यातील वरवंडी या गावातून सुरू झालेली त्यांची वाटचाल आज संगमनेर शहरात दर्जेदार दंतसेवा देण्यापर्यंत पोहोचली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नुकताच त्यांना 'नवदुर्गा नारी सन्मान २०२६' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.



डॉ. कांचन यांचे बालपण शिक्षक कुटुंबात गेले. आई-वडील दोघेही प्राथमिक शिक्षक असल्याने त्यांना लहानपणापासून शिस्त, प्रामाणिकपणा, कष्ट आणि माणुसकीचे संस्कार लाभले. आई-वडिलांच्या नोकरीतील बदल्यांमुळे शिक्षणात खंड पडू नये, यासाठी पाचवीत असतानाच त्यांना लोणी येथील कन्या विद्यामंदिरच्या वसतिगृहात ठेवण्यात आले. बालवयातच घरापासून दूर राहून त्यांनी स्वावलंबनाचे धडे घेतले. याच अनुभवांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आत्मविश्वासाची भक्कम जोड दिली.

प्रवरानगर येथील पी. व्ही. पी. ज्युनिअर कॉलेजमधून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी संगमनेर येथील एस. एम. बी. टी. डेंटल कॉलेजमधून बीडीएस पदवी प्राप्त केली. दंतचिकित्सा क्षेत्रातील ज्ञान अधिक समृद्ध करण्याच्या उद्देशाने त्यांनी मुंबई येथील शासकीय दंत महाविद्यालयातून इम्प्लांटोलॉजी विषयातील फेलोशिपही पूर्ण केली. शिक्षण, कौशल्य आणि अनुभव यांच्या जोरावर त्यांनी व्यावसायिक क्षेत्रात आत्मविश्वासाने पाऊल टाकले.

मुलगी स्वावलंबी व्हावी आणि तिने स्वत:च्या पायावर उभे राहावे, या दूरदृष्टीतून त्यांच्या आई-वडिलांनी विवाहापूर्वीच स्वत:चे दंतचिकित्सालय उभारून दिले. पालकांनी दाखविलेला विश्वास हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरला. विवाहानंतर पती आणि सासरच्या मंडळींची साथ लाभल्याने कुटुंब आणि व्यवसाय यांचा समतोल साधणे त्यांना शक्य झाले आहे. चार महिन्यांच्या कन्येची आई म्हणून मातृत्वाची जबाबदारी सांभाळतानाच त्या आपल्या व्यावसायिक कार्यातही सातत्य राखत आहेत. कुटुंबाचा आधार, स्वत:ची जिद्द आणि कामाप्रती असलेली निष्ठा यामुळे त्यांची वाटचाल अधिक प्रेरणादायी बनली आहे.

रुग्णसेवेतून विश्वासाची नवी ओळख

ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर येथे असलेल्या 'श्री साईनाथ डेंटल क्लिनिक'च्या माध्यमातून डॉ. कांचन सहाणे-शिंदे रुग्णांना दंतसेवा देत आहेत. दातांचे आरोग्य, योग्य उपचार, आवश्यक मार्गदर्शन आणि रुग्णांचा विश्वास जपणे याला त्या विशेष महत्त्व देतात. 'दंतचिकित्सा म्हणजे केवळ दातांवरील उपचार नव्हेत, तर रुग्णांचे आरोग्य सुधारण्यासोबतच त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि आत्मविश्वास फुलविण्याचे माध्यम आहे,' अशी त्यांची भूमिका आहे. त्यामुळे रुग्णसेवेला त्यांनी आपल्या व्यवसायाचा केंद्रबिंदू बनविले आहे.

डॉ. कांचन यांचा प्रवास हा ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचे, स्वावलंबनाचे आणि पालकांच्या सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करणारा आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षण, कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर यशाची शिखरे गाठता येतात, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. 'मुलींना केवळ भरारी घेण्याची शिकवण देऊ नका; त्यांना भरारी घेण्यासाठी आकाशही द्या!' हा संदेश त्यांच्या यशस्वी वाटचालीतून समाजापर्यंत पोहोचत आहे. ग्रामीण मातीत फुललेले हे कर्तृत्वाचे फूल आज अनेकांच्या प्रेरणेचा सुगंध दरवळवत आहे.

दिव्यांग बांधवांची दिवाळी गोड करा

दिव्यांग सहाय्य सेनेची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी नगरपरिषदेकडून राखीव ठेवण्यात येणारा ५ टक्के निधी दिवाळीपूर्वीच पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर वितरित करावा, अशी आग्रही मागणी दिव्यांग सहाय्य सेना, अहिल्यानगरच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच नगराध्यक्षा यांना निवेदन देण्यात आले आहे.

दिव्यांग बांधवांना दैनंदिन जीवनात अनेक आर्थिक आणि सामाजिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यातच अनेक दिव्यांग व्यक्तींची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने सण-उत्सव साजरे करतानाही त्यांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागते. दिवाळीसारखा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण त्यांच्या कुटुंबीयांनाही आनंदाने साजरा करता यावा, यासाठी नगरपरिषदेने संवेदनशील भूमिका घेण्याची गरज असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शासनाच्या नियमानुसार दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी नगरपरिषदेमार्फत ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात येतो. मात्र, हा निधी वेळेत वितरित न झाल्यास त्याचा लाभ गरजू दिव्यांग व्यक्तींना योग्य वेळी मिळत नाही. त्यामुळे कोणतीही दिरंगाई न करता राखीव निधीचे वितरण दिवाळीपूर्वी पूर्ण करावे आणि पात्र दिव्यांग लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट रक्कम जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

नगरपरिषद प्रशासनाने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून निधी वितरणाला प्राधान्य द्यावे. प्रशासनाच्या सकारात्मक निर्णयामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या दिव्यांग बांधवांच्या घरातही दिवाळीचा आनंद आणि प्रकाश निर्माण होईल, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. दिव्यांग बांधवांच्या हक्काचा निधी त्यांना वेळेत मिळणे आवश्यक असून, केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष कार्यवाही करावी, असे आवाहन दिव्यांग सहाय्य सेनेचे जिल्हाध्यक्ष जालिंदर लहामगे यांनी केले आहे. या निवेदनावर अमति डहाळे, सुनिल अमले, भगवान भोईर, विजय अडेप, किशोर मेहरकर, दत्तात्रय अडकी, अशोक डफेदार, हरिश्चंद्र देशमुख यांच्यासह अनेकांच्या सह्या आहेत.

पान १ वरून

जिल्हा बँक..

शेतीपूरक आमदार आशुतोष काळे विरुद्ध सुधीर म्हस्के, महिला राखीव जागांसाठी अनुराधा नागवडे संगीता वाघ, हर्षदा काकडे, संध्या महांडुळे आणि मंजूषा गुंड यांच्यासह उमेदवार मैदानात आहेत. अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गात वैभव पिचड आणि प्रशांत लोखंडे यांच्यात लढत आहे. ओबीसी आणि भटक्या विमुक्त प्रवर्गातही अनेक उमेदवारांमध्ये सामना रंगणार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकरी, विकास सोसायटच्या आणि सहकार क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वाची आर्थिक संस्था आहे. त्यामुळे या निवडणुकीत कोणत्या गटाला किती प्रतिनिधित्व मिळते, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. थोरात-विखे यांची एकत्रित राजकीय ताकद, खासदार नीलेश लंके यांची भूमिका आणि सभापती राम शिंदे यांच्या गटाची स्वतंत्र रणनीती या निवडणुकीतील महत्त्वाचे घटक ठरत आहेत. २ नोव्हेंबरच्या मतदानानंतर ३ नोव्हेंबरला होणाऱ्या मतमोजणीत जिल्हा बँकेच्या राजकीय सत्तेचे चित्र स्पष्ट होणार आहे.

संपादकीय...

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना कायमची प्रतीक्षाच का?

भारत हा कृषिप्रधान देश असल्याचे अभिमानाने सांगितले जाते. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी मात्र आजही आपल्या मूलभूत प्रश्नांसाठी संघर्ष करताना दिसतो. निवडणुका आल्या की शेतकऱ्यांच्या हिताच्या घोषणा होतात, कर्जमाफीची आश्वासने दिली जातात, शेतीमालाला योग्य भाव देण्याचे वचन दिले जाते. मात्र निवडणुका संपल्या की शेतकऱ्यांचे प्रश्न पुन्हा एकदा सरकारी फाईलींमध्ये अडकतात. त्यामुळे आज सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मनात एकच प्रश्न निर्माण होत आहे की, शेतकऱ्यांच्या प्रश्नांना कायमची प्रतीक्षाच का? शेती हा निसर्गावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, तर कधी पावसाचा खंड आणि दुष्काळ अशा संकटांचा सामना शेतकऱ्यांना सातत्याने करावा लागतो. मोठ्या कष्टाने पिकवलेले पीक हातात येण्याच्या वेळी निसर्गाची अवकृपा होते. पीक वाचले तर बाजारभावाचा प्रश्न निर्माण होतो. कांदा, सोयाबीन, कापूस, मका, ऊस यांसारख्या पिकांच्या दरांमध्ये होणारे चढ-उतार शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडवतात. उत्पादन खर्च वाढत असताना शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नाही. बियाणे, खते, औषधे, मजुरी, वीज आणि पाणी यांचा खर्च वाढतो; मात्र शेतमालाच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न अनेकदा खर्चाची भरपाईही करू शकत नाही. मग शेती करायची तरी कशाच्या भरवशावर, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहतो. सरकारकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना जाहीर केल्या जातात. पीकविमा, अनुदान, नुकसानभरपाई, कर्जमाफी आणि सिंचन योजनांच्या माध्यमातून मदत करण्याचे प्रयत्न होतात. परंतु या योजनांचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचताना अनेक अडथळे निर्माण होतात. कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाइन अर्ज, तांत्रिक त्रुटी, पंचनाम्यांमधील विलंब आणि प्रशासकीय दिरंगाई यामुळे शेतकऱ्यांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यानंतर तातडीने मदत मिळणे अपेक्षित असते. मात्र मदत मिळेपर्यंत पुढील हंगामाची वेळ येते. संकटाच्या काळात शेतकऱ्याला त्वरित आधार मिळाला नाही, तर योजनांच्या घोषणांचा उपयोग काय? शेतीमालाच्या बाजारभावाचा प्रश्न तर अधिक गंभीर आहे. शेतकऱ्यांनी उत्पादन घ्यायचे, त्यासाठी कर्ज काढायचे, दिवसरात्र मेहनत करायची आणि बाजारात माल विक्रीसाठी नेल्यानंतर व्यापाऱ्यांकडून मिळेल तो भाव स्वीकारायचा, अशी परिस्थिती अनेकदा निर्माण होते. बाजारभावातील अस्थिरता कमी करण्यासाठी सरकारने प्रभावी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी, वेळेवर सरकारी खरेदी, साठवणूक व्यवस्था आणि प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन या बाबींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. केवळ हमीभाव जाहीर करून चालणार नाही, तर त्या भावाने प्रत्यक्ष खरेदी होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. दुष्काळ आणि पाणीटंचाईचा प्रश्नही शेतीसमोरील मोठे आव्हान आहे. पावसावर अवलंबून असलेल्या भागातील शेतकऱ्यांना प्रत्येक हंगामात अनिश्चिततेचा सामना करावा लागतो. जलसंधारण, शेततळी, बंधारे, ठिबक सिंचन आणि पाण्याचे काटेकोर नियोजन यांसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. जलजीवन, सिंचन आणि पाणीपुरवठ्याच्या योजना केवळ कागदावर राहून उपयोग नाही. त्यांची गुणवत्ता, पूर्णत्व आणि प्रत्यक्ष लाभ यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. गावागावांत पाण्याचे नियोजन झाले, तर शेतीवरील संकटाची तीव्रता निश्चितच कमी होऊ शकते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे पाहताना आणखी एका महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेतीकडे तरुण पिढीचा ओढा कमी होत आहे. शेतीतून निश्चित उत्पन्न मिळत नसल्याने अनेक तरुण नोकरी आणि व्यवसायाच्या शोधात शहरांकडे वळत आहेत. ही परिस्थिती बदलायची असेल, तर शेतीला आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ, अन्नप्रक्रिया उद्योग आणि योग्य आर्थिक पाठबळ देणे आवश्यक आहे. शेती हा तोट्याचा नव्हे, तर सन्मानाने जगण्याचा व्यवसाय बनला पाहिजे. शेतकऱ्यांना मदत करणे म्हणजे केवळ आर्थिक अनुदान देणे नव्हे. त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव, वेळेवर वीज, पुरेसे पाणी, दर्जेदार बियाणे, सुलभ कर्जपुरवठा आणि संकटाच्या काळात तत्काळ नुकसानभरपाई मिळणे, ही शासनाची जबाबदारी आहे. त्याचबरोबर कृषी विभागातील रिक्त पदे भरणे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करणे आणि योजनांच्या अंमलबजावणीवर नियमित देखरेख ठेवणेही गरजेचे आहे. आज गरज आहे ती शेतकऱ्यांना आश्वासनांच्या नव्हे, तर ठोस कृतीच्या आधाराची. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर राजकीय श्रेयवाद करण्यापेक्षा सर्व पक्षांनी एकत्र येऊन दीर्घकालीन उपाययोजना आखल्या पाहिजेत. प्रत्येक संकटानंतर मदतीची घोषणा आणि प्रत्येक निवडणुकीपूर्वी कर्जमाफीचे आश्वासन, या चक्रातून शेतीला बाहेर काढण्याची वेळ आली आहे.

शिरपुंजे येथील भैरवनाथ गडावर भाविकांची दर्शनासाठी अलोट गर्दी



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- आदिवासी समाजाचा कुलदैवत असलेलं भैरवनाथ गडावर मोठी यात्रा भरते. राजूरपासून २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या शिरपुंजे येथील भैरवनाथ गडावर, दिवाळीच्या पूर्वसंध्येला येणाऱ्या आश्विन महिन्यातील रविवारी मोठी जत्रा भरते. या जत्रेला 'वाट' असेही म्हणतात. भैरवनाथ गड शिरपुंजे गावाच्या पायथ्यापासून साधारणपणे चौदाशे मीटर उंचीवर आहे.

भाविकांचे श्रद्धास्थान असलेले येथे सर्व समाजातील महिला ज्यांना संतती होत नाहीत, असे महिला पायथ्यापासून केसांनी रस्ता झाडीत गडावर जातात, यालाच 'वाट' असे म्हणतात, अशी माहिती जुने जाणते ग्रामस्थ सांगतात. महिला चप्पल न घालता गडावर जात असता.आज या वाटच्या विधीमध्ये ६० महिलांनी सहभाग घेतला होता.

लावल्यामुळे एकच झुंबड उडाली होती. जागोजागी वन्यजीव विभागाने रेलिंग (संरक्षक कठडे) लावल्यामुळे भाविकांचा थोडा त्रास कमी झाला होता. तसेच, राज्यातील कानाकोपऱ्यातून भाविकांनी हजेरी लावली. भैरवनाथ हे आदिवासी समाजाचे दैवत असल्यामुळे येथील आदिवासी समाज भात पिकाचे नैवेद्य म्हणून सर्वप्रथम भैरवनाथाला गडावर घेऊन जातात.

दरवर्षी आश्विन महिन्यात ही यात्रा भरते. वन विभागाच्या वन परिक्षेत्र अधिकारी प्रतिभा सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गार्ड व स्थानिक मुलांच्या मदतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच, आमदार डॉ. किरण लहामटे , माजी सभापती मारुती मेंगाळ यांनी भेट या वेळी भेट दिली. राजूर पोलीस स्टेशनच्या वतीने सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्यात मार्गदर्शनाखाली काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस उपनिरीक्षक परसराम तागड व पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता

यावेळी ह.भ.प. दारकू महाराज धिंदळे, सरपंच कांताबाई धिंदळे, उपसरपंच गुलाब धिंदळे, रंगनाथ पाटील मोहन धिंदळे, नाथू धिंदळे यांच्या सह यात्रा कमिटी आणि भैरवनाथ तरुण मित्र मंडळाच्या वतीने यात्रेत लक्ष ठेवण्यात आले होते.

ढाकणे शैक्षणिक संकुल विद्यापीठ होणार - डॉ. पालवे

४८ विद्यार्थ्यांना एमबीए पदवी प्रदान

युवावार्ता (प्रतिनिधी)

शेवगाव - ढाकणे शैक्षणिक संकुलाची शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. संस्थेची ही वाटचाल पाहता येत्या काही वर्षांत या संस्थेचे विद्यापीठात रूपांतर झालेले पहायला मिळेल, असा विश्वास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. संदीप पालवे यांनी व्यक्त केला.

केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित सुनीताताई एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, ढाकणे शैक्षणिक संकुल राक्षी (ता. शेवगाव) येथे आयोजित एमबीए पदवी प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुणे पालवे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एकनाथ ढाकणे होते. यावेळी जागतिक आरोग्य सल्लागार

डॉ. तुकाराम नेहरकर, संस्थेचे उपाध्यक्ष श्रीकांत ढाकणे, कोषाध्यक्ष हृषीकेश ढाकणे, महाविद्यालयाचे संचालक डॉ. आर. एच. अत्तार आदी प्रमुख उपस्थित होते.

डॉ. संदीप पालबे म्हणाले, की नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संस्थेमध्ये सुरू असलेल्या शैक्षणिक उपक्रम कौतुकास्पद सुरू आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व्यवस्थापन शिक्षषण मिळावे, यासाठी संस्थेने केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

एकनाथ ढाकणे म्हणाले की, विद्यार्थ्यांना प्रतिकूल परिस्थितीकडे संधी म्हणून पाहून जिद्द, मेहनत व आत्मविश्वासाच्या बळावर यश संपादन करावे. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ. तुकाराम नेहरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ग्रामीण भागात २०२४ मध्ये सुरू झालेल्या या व्यवस्थापन महाविद्यालयातील ४८ विद्यार्थ्यांना यावेळी एमबीए पदवी प्रदान करण्यात आली. महाविद्यालयाने १०० टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. योगेश्वर शिरसाट, प्रा. भक्ती पंचारिया, प्रा. जगदीश दळे यांनी विशेष प्रयत्न केले. महाविद्यालयाचे संचालक डॉ. आर. एच. अत्तार यांनी महाविद्यालयाच्या वर्षभरातील शैक्षणिक प्रगतीचा आढावा सादर केला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. सुनील औताडे यांनी केले.

अश्विन आयुर्वेदच्या बीएएमएसचा शंभर टक्के निकाल

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्यावतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२६ सत्राच्या परीक्षेत मांचीहिल (ता. संगमनेर) येथील अश्विन रुरल आयुर्वेद महाविद्यालयाचा अंतिम (चतुर्थ) वर्ष बी. ए. एम. एस. परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून, संस्थेने आपली १०० टक्के निकालाची परंपरा याही वर्षी कायम राखली आहे.

परीक्षेसाठी महाविद्यालयातून एकूण ९० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि हे सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले.

यंदाही विद्यार्थिनींनी बाजी मारत गुणवत्ता यादीवर आपले नाव कोरले आहे. यामध्ये विशाखा मधुकर बिरादार हिने १७९१ गुणांसह महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला, तर साक्षी संजय माथनीकर हिने १७८८ गुणांसह द्वितीय आणि सिध्दी अशोक धायबर हिने १७७२ गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला.

याबद्दल संकुलाचे संस्थापक ॲड. शाळीग्राम होडगर, संचालिका नीलिमा गुणे, विश्वस्त डॉ. शैलेन्द्रसिंह होडगर, डॉ. दिग्विजयसिंह होडगर, अध्यक्ष विजय पिसे, उपाध्यक्ष अण्णासाहेब बलमे, प्राचार्य डॉ. श्यामल निर्मळ, डॉ. संजीव लोखंडे, उपप्राचार्य डॉ. शिवपाल खंडीझोड, डॉ. जितेंद्र शिंपी, डॉ. चंद्रकांत गिरगुणे, अधीक्षक रंगनाथ गिते, हॉस्पिटलचे अधीक्षक डॉ. राजन कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी दत्ता शिंदे, संगणक विभागाचे अशोक पर्वत, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

मालपाणी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बनविले आकर्षक आकाश कंदील

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर : - दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, सृजनशीलतेचा आणि सांस्कृतिक मूल्यांचा उत्सव! या पार्श्वभूमीवर मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयात इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एक अनोखी पर्यावरणपूरक आकाशकंदील निर्मिती कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून २०० हून अधिक पारंपरिक, स्वदेशी आणि पर्यावरणस्नेही आकाशकंदील तयार केले.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वनिर्मितीची आवड, पुनर्वापराचे भान ,टाकाऊतून टिकाऊ वस्तू आणि पर्यावरणाची जाणीव निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी जुन्या रंगीत कागदांचा, झिरमिळ्यांचा, पताका, काड्या, दोऱ्या आणि इतर टाकाऊ वस्तूंचा कल्पक वापर करून सुंदर व आकर्षक आकाशकंदील स्वतःच्या कल्पनाशक्तीने तयार केले . . . कोणतेही प्लास्टिक न वापरता, अल्प खर्चात दिवाळी सजावटीची ही कलात्मक



आकाश कंदील तयार करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी दाखवलेली कल्पकता, हस्तकौशल्य आणि सर्जनशीलता यांचे सर्वत्र कौतुक झाले. विविध आकार, रंगसंगती आणि रचनांमधून विद्यार्थ्यांच्या कलादृष्टीची झलक उमटली. 'मेड इन इंडिया' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेला अनुसरून, संपूर्णतः भारतीय आणि स्थानिक पारंपरिक तयार केलेले हे आकाशकंदील स्वदेशी आत्मनिर्भरतेचे प्रतीक ठरले. कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांना कलाशिक्षक संतोष गोरे व आप्पासाहेब मिंडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पारंपरिक आकाशकंदिलांचे महत्त्व, त्यांची शास्त्रशुद्ध रचना आणि पर्यावरणपूरकतेची आवश्यकता याविषयी सखोल माहिती दिली.

या उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, पर्यवेक्षक रंजना पवार आणि शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्ग यांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ एक सर्जनशील दिवाळी साजरी करण्याची संधी नव्हती, तर पर्यावरण संवर्धन, स्वदेशी निर्मिती, आणि टाकाऊतून उपयुक्त वस्तू तयार करण्याचे मूल्य अंगीकारण्याची शिकवण देणारा अनुभव होता.

युवावार्ता
छोट्या जाहिराताठी संपर्क करा

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SONALI BHAUSAHEB DONGARE
(AFTER MARRIAGE)
NEW NAME AS
SONALI RAVINDRA PAWASE
ADD - AT/POST HIVARGOON PAWASA, TAL- SANGAMNER DIST- AHILYANAGAR

प्रो. रु. रजि. नं.
ॲड. बी. आर. राऊत
फौजदारी न्यायालय कोर्ट नं.४
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर
जाहीर नोटीस
मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर
क्रि. चौ.अर्ज नं. ६८०/२०२६ यांचे कोर्टात
बशीर अहमद सय्यद ---- अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक मौजे आश्वी खु ---- सा. वाले
अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदार याचा जन्म दि. ०४/१०/१९४८ रोजी मौजे आश्वी खु ता संगमनेर जि. अ. नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे.. अर्जदार याचे जन्माची नोंद आश्वी खु, ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं. २ यांचे कोर्टात क्रि.चौ.अ.नं... ६८०/२६ हा अर्ज अर्जदार याने दि. ०४/१०/१९४८ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी दाखल केला आहे.
सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याचा जन्म दि. ०४/१०/१९४८ रोजी मौजे आश्वी खु ता संगमनेर जि अ नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. वासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. २६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल
सही तयार करणार
शिक्का
हुकूमावरून
सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायलय कोर्ट नं. ४ संगमनेर

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१ कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १ अनुभव असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत
गरजू व अनुभवी साईट इंजिनीअर, सुपरवायझर व ऑफिस असीस्टंट पाहिजेत
- संपर्क -
चिंतामणी डेव्हलपर्स
7741057560

पाहिजेत
ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर
- संपर्क -
8308015324

Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
• बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
• कार्यालयीन प्रशासक – १
• आयटी प्रोफेशनल – १
• संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १
पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

फ्लॅट विकणे आहे!
फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

SR THORAT
पाहिजेत
SR THORAT
मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक
आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे.
साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

१.क्रं	गाडीचा प्रकार
१	छोटा हत्ती
२	टाटा झिप
३	महिंद्रा जीतो
४	मारुति सुजुकी सुपर कॅरि

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस- एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७

संगमनेर तालुक्यात दुष्काळाची चाहूल; ९ गावांना टँकरने पाणीपुरवठा

चारा-पाणी नियोजनासह रोजगारनिर्मितीवर प्रशासनाचा भर

संगमनेर : तालुक्यात यंदा अपेक्षित सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत केवळ ६८.८ टक्के पावसाची नोंद झाली असून, ग्रामीण भागात पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महसूल प्रशासनाने टंचाई निवारण, टँकरद्वारे पाणीपुरवठा, पशुधनासाठी चारा नियोजन, पीक नुकसान भरपाई, जलसंधारण आणि रोजगारनिर्मितीच्या उपाययोजनांना गती दिली आहे. सध्या तालुक्यातील नऊ गावांना नऊ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, ५९ गावांसाठी सुमारे १२.३६ कोटी रुपयांचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच डिजिटल क्रॉप सर्वेक्षणाचे उर्वरित काम पुढील पाच दिवसांत पूर्ण करण्याचे आवाहन तहसीलदार धीरज मांजरे यांनी केले आहे.

तहसील कार्यालयामार्फत पर्जन्यमान, पीक नुकसान, पीकविमा, रब्बी हंगाम, चारा-पाणी उपलब्धता आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेतला जात आहे. टंचाईच्या परिस्थितीत नागरिक आणि पशुधनाला आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर प्रशासनाचा भर आहे. यासाठी दर मंगळवारी तहसील कार्यालयात संबंधित विभागांची आढावा बैठक घेण्यात येत आहे.

सरासरीच्या तुलनेत पावसाची तूट

संगमनेर तालुक्याचे अपेक्षित सरासरी पर्जन्यमान ४०२ मिमी असून, आतापर्यंत २७६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मंडळनिहाय स्थिती पाहता साकूर मंडळात सरासरीच्या केवळ ३६ टक्के, शिबलापूरमध्ये ४५ टक्के, आश्वीमध्ये ५२ टक्के, पिंपरणेमध्ये ६० टक्के, नांदूर खंदरमाळमध्ये ६४ टक्के, तर



तळेगाव मंडळात ६९ टक्के पाऊस झाला आहे. पावसाच्या असमान वितरणामुळे शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे.

तालुक्यातील १७४ गावांमधील पीक नुकसान व मदतीसंदर्भातील कार्यवाही सुरू आहे. पावसावर अवलंबून असलेल्या पिकांचे ३९ हजार ६६७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, अंदाजित नुकसान ३३ कोटी ७० लाख रुपये आहे. फळपिकांचे ४ हजार ९२९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, त्यांचे अंदाजित नुकसान ११ कोटी रुपये आहे. दोन हेक्टरपेक्षा अधिक नुकसान झालेल्या ४ हजार ८३३ खातेदारांचे ४ हजार ११३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, अंदाजित नुकसान ४ कोटी ७६ लाख रुपये नोंदविण्यात आले आहे.

पीकविम्यासाठी तालुक्यात १७ हजार ७१ अर्ज प्राप्त झाले असून, विमा अर्जांशी संबंधित क्षेत्र ८ हजार १२२ हेक्टर आहे. यामध्ये सोयाबीनचे ९ हजार १०१, मक्याचे ३ हजार ५१ आणि कापसाचे १ हजार ९२४ अर्ज आहेत. पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार मदत मिळण्यासाठी लाभार्थी याद्या, नोंदी आणि पडताळणीची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन करण्यात येत आहे. प्रवरा नदी परिसर, निळवंडे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याचे लाभक्षेत्र, गाव तलाव आणि शेततळ्यांच्या परिसरात चारा पिकांची लागवड करण्याच्या शक्यता तपासल्या जात आहेत. पशुसंवर्धन विभागामार्फत २२ टन चारा बियाणे, तर कृषी विभागामार्फत २१० क्विंटल बियाणे उपलब्धतेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. कमी जागेत चारा उत्पादनासाठी हायड्रोपोनिक पद्धतीचाही विचार केला जात आहे.

सन २०२४ च्या पशुगणनेनुसार तालुक्यात १ लाख ८७ हजार ७१७ गाई-बैल, ६५ हजार ५४८ शेळ्या आणि ४३ हजार ४३८ मेंढ्या आहेत. एवढ्या मोठ्या पशुधनासाठी उपलब्ध चारा व मुरघासाचा साठा किती दिवस पुरेल, याचा आढावा घेऊन भविष्यातील गरजेनुसार नियोजन केले जात आहे. मांडवे, बिरेवाडी आणि जांभुळवाडी येथे प्रत्यक्ष पाहणी करून चारा व्यवस्थेची स्थिती तपासण्यात आली.

टंचाईच्या काळात ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी 'विकसित भारत-जी राम जी' योजनेअंतर्गत कृती आराखडा तयार करण्यावर भर देण्यात येत आहे. कृषी, पशुसंवर्धन, वन, जलसंधारण आणि जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागांनी रोजगारनिर्मितीची कामे निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. टंचाई कृती आराखड्यातील ५९ गावांसह लगतच्या गावांमध्येही आवश्यक कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

आदिवासीबहुल भागातून रोजगारासाठी होणारे स्थलांतर कमी करणे, भूजल पुनर्भरण वाढविणे आणि 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेतून गाव तलावांचे खोलीकरण करून जलसाठवण क्षमता वाढविणे, यावरही प्रशासनाचा भर आहे. उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी वन विभागाला आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

टंचाई कृती आराखड्यातील ५९ गावांची लोकसंख्या १ लाख १० हजार ३९, तर पशुधन ८७ हजार ८१४ इतके नमूद आहे. नागरिकांसाठी ३९ आणि पशुधनासाठी ६५ टँकरची तरतूद नियोजनात करण्यात आली आहे. सध्या नऊ गावांमध्ये नऊ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पाण्याची गुणवत्ता तपासणे, गावनिहाय वेळापत्रक निश्चित करणे आणि टँकरमधील पाणी निर्धारित साठवण टाक्यांमध्येच रिकामे केले जाते याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

डिजिटल क्रॉप सर्वे पाच दिवसांत पूर्ण करण्याचे आवाहन

संगमनेर तालुक्यात एकूण २ लाख ४३ हजार ८२९ प्लॉट असून, पीक सर्वेक्षणासाठी ३२४ सर्वेक्षक कार्यरत आहेत. उपलब्ध माहितीनुसार क्षेत्रनिहाय सर्वेक्षणाची प्रगती ५९.४५ टक्के आहे. उर्वरित सर्वेक्षण विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या शेतकऱ्यांचे डिजिटल क्रॉप सर्वेक्षण अद्याप झालेले नाही, त्यांनी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून पुढील पाच दिवसांत सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी धीरज मांजरे यांनी केले आहे.

रस्ता विचारण्याचा बहाण्याने वृद्ध महिलेचे मंगळसूत्र पळविले

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर: दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या वृद्ध दाम्पत्याला रस्ता विचारण्याच्या बहाण्याने अडवून दुचाकीवरील दोघा चोरट्यांनी ७० वर्षीय वृद्धेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून धूमस्टाईल पलायन केले. ही घटना कौठे मलकापुर शिवारात भर दिवसा घडली. याबाबत वच्छलाबाई तबाजी ढेंबरे (वय ७०, रा. बिरेवाडी, साकूर,) यांनी पोलिसांत फिर्याद दिली .

वच्छलाबाई ढेंबरे व पती तबाजी ढेंबरे दुपारी १२ वाजता स्कुटीवरून खरशिंदे येथे मुलीला भेटण्यासाठी गेल्या होत्या. दरम्यान, कौठे मलकापूरगावच्या शिवारात ते आले असता, पाठीमागून मोटारसायकलवरून दोघे अनोळखी आले. त्यांनी तबाजी ढेंबरे यांना, 'हा रस्ता साकूरकडे जातो का,' अशी विचारणा केली. त्यावर दाम्पत्याने होकार दिला. त्यानंतर मोटारसायकलवरील दोघे त्यांच्या स्कुटीजवळून पुढे जात असतानाच मागे बसलेल्या इसमाने अचानक वच्छलाबाई यांच्या गळ्यातील मणी मंगळसूत्र जोरात हिसकावले. दोन्ही चोरटे मंगळसूत्र हिसकावून मोटारसायकलवरून साकूरच्या दिशेने पसार झाले. या घटनेत सुमारे ९० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मणी मंगळसूत्र चोरीस गेले आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

थोरात कारखान्याकडून सभासदांना मोफत 30 किलो साखर वाटप सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा राज्याचे माजी शिक्षण व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण देशासाठी दिशादर्शक असलेल्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने शेअर्स पूर्ण असलेल्या सभासदांना ३० किलो मोफत साखरचे वितरण सुरू झाले आहे.

कारखाना गोडाऊन मध्ये व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील



घुले, संचालक संपतराव गोडगे, सौ.लताताई गायकर, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, कार्यालयीन अधीक्षक कृष्णा दिघे, भाऊसाहेब खर्डे, शेखर वाघ, ड.बाबासाहेब गायकर यांच्या उपस्थितीमध्ये संचालकांना मोफत साखर वितरण सुरू करण्यात आले.

माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली थोरात कारखान्याने कायम सभासद, शेतकरी,ऊस उत्पादक कामगार यांचे हित जोपासले आहे. दिवाळीनिमित्ताने कार्यक्षेत्रातील उसासाठी २०० रुपये अनुदान दिले असून कामगारांना २०% बोनस व तीस दिवसांचे सानुग्रह अनुदान आहे.

तर ३० सप्टेंबर २०२६ अखेर शेअर्स पूर्ण असलेल्या सर्व सभासदांना ३० किलो मोफत साखर वाटप करण्यात आली आहे. गोडाऊन क्रमांक १२ व १३ मध्ये तीन दिवस सुरू राहणार आहे.

यावेळी बोलताना पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, कारखान्याने कायम सर्वसामान्य नागरिक,शेतकरी,सभासद यांचा विचार केला आहे. दिवाळीच्या निमित्ताने कारखान्याने १ लाख मे.टनाचे गाळपही आज पूर्ण केले असल्याने हा आनंदाचा दिवस आहे. यामध्ये सर्वांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे हि ते म्हणाले. तर सभासदांनी आपली साखर कारखाना कार्यस्थळावर येऊन घेऊन जावे असे आवाहनही त्यांनी केले.

दिनविशेष

१९४६: जपान — देशाचे संविधान सम्राटाच्या संमतीने स्वीकारले गेले.
१९४४: अखिल भारतीय संगीत परिषद — पुण्यात सुरुवात.
१९४३: दुसरे महायुद्ध — अमेरिकन हवाई दलाच्या पाचशे विमानांनी जर्मनीतील विल्हेल्मशेव्हन बंदर उध्वस्त केले.
१९४२: दुसरे महायुद्ध — कोली पॉइंट कारवाई ग्वाडालकॅनल मोहिमेदरम्यान सुरू झाली.
१९११: शेवरोलेट ऑटोमोबाइल कंपनी — सुरु झाली.
१९०३: पनामा — कोलंबियापासून वेगळे झाले.
१८६८: जॉन विलिस मेनार्ड (आर-एलए) — हे अमेरिकेतील कॉंग्रेससाठी निवडलेले पहिले आफ्रिकन अमेरिकन बनले.
१८३८: द टाइम्स ऑफ इंडिया — जगातील सर्वात मोठे इंग्रजी भाषेतील वृत्तपत्र, बॉम्बे टाइम्स आणि जर्नल ऑफ कॉमर्स या नावाने स्थापन झाले.
१८१७: बँक ऑफ मॉन्ट्रियल — कॅनडा देशातील सर्वात जुनी चार्टर्ड बँक, मॉन्ट्रियलमध्ये

जन्म

९९७: सार्थक गोलूई — भारतीय फुटबॉलपटू
१९३७: लक्ष्मीकांत शांताराम कुडाळकर — भारतीय संगीतकार, लक्ष्मीकांत-प्यारेलाल या जोडीतील संगीतकार (निधन: २५ मे १९९८)
१९३३: अमर्त्य सेन — भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि तत्ववेत्ता — भारतरत्न, नोबेल पुरस्कार
१९२१: शिन क्युकहो — लोटे ग्रुपचे संस्थापक, दक्षिण कोरियन-जपानी व्यापारी (निधन: १९ जानेवारी २०२०)
१९२१: चार्ल्स ब्रॉन्सन — अमेरिकन अभिनेते (निधन: ३० ऑगस्ट २००३)
१९१८: एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन — अमेरिकेतील पहिल्या महिला यूएस आर्मी ब्रिगेडियर जनरल (निधन: २१ ऑगस्ट २००७)
१९१७: अन्नपूर्णा महाराणा — भारतीय स्वतंत्रसैनिक (निधन: ३१ डिसेंबर २०१२)
१९१२: अल्फ्रेडो स्ट्रोस्नर — पराग्वे देशाचे ४६वे राष्ट्राध्यक्ष, जनरल आणि हुकूमशहा (निधन: १६ ऑगस्ट २००६)

मृत्यू

२०२२: जी. एस. वरदाचारी — भारतीय चित्रपट समीक्षक आणि पत्रकार
२०२२: इम्रान खान — पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर अयशस्वी जीवघेणा हल्ला करण्यात आला. यात त्याचा जीव वाचला.
२०१४: सदाशिव अमरापूरकर — भारतीय अभिनेते (जन्म: ११ मे १९६०)
२०१२: कैलाशपती मिश्रा — भारतीय राजकारणी, गुजरातचे १५वे राज्यपाल
२०००: गिरी देशिंगकर — भारतीय चीनविषयक तज्ञ आणि पूर्व आशियाई घडामोडींचे अभ्यासक
१९९८: बॉब केन — अमेरिकन कॉमिक बुक लेखक, बॅटमॅन पत्राचे निर्माते
१९९८: आर. सी. हिरेमठ — भारतीय कन्नड साहित्यिक, कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू
१९९६: जीन-बेडेल बोकासा — मध्य आफ्रिकन प्रजासत्ताकचे २रे अध्यक्ष
१९९२: प्रेम नाथ — भारतीय अभिनेते (जन्म: २१ नोव्हेंबर १९२६)
१९९०: मामोहन कृष्ण — भारतीय अभिनेते (जन्म: २६ फेब्रुवारी १९२२)
१९७५: ताजुद्दीन अहमद — बांगलादेशचे पहिले पंतप्रधान (जन्म: २३ जुलै १९२५)



दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

०३ नोव्हेंबर

१८३८ : 'द टाइम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्राची स्थापना

भारतीय वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात 'द टाइम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी दैनिकाला विशेष महत्त्व आहे. ३ नोव्हेंबर १८३८ रोजी मुंबई येथे या वृत्तपत्राची सुरुवात झाली. सुरुवातीला या वृत्तपत्राचे नाव 'बॉम्बे टाइम्स अँड जर्नल ऑफ कॉमर्स' असे होते. ब्रिटिश राजवटीच्या काळात मुंबई हे देशातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र म्हणून विकसित होत होते. व्यापार, उद्योग, बाजारपेठ आणि सरकारी धोरणांशी संबंधित माहिती मिळवण्यासाठी व्यापारी वर्गाला एका स्वतंत्र वृत्तपत्राची गरज होती. याच गरजेतून या वृत्तपत्राची स्थापना करण्यात आली.सुरुवातीच्या काळात 'बॉम्बे टाइम्स अँड जर्नल ऑफ कॉमर्स' हे वृत्तपत्र आठवड्यातून दोन वेळा प्रकाशित होत असे. व्यापारविषयक घडामोडी, आयात-निर्यात, बाजारभाव, सरकारी निर्णय, स्थानिक बातम्या आणि सामाजिक विषयांना त्यामध्ये स्थान दिले जात होते. त्यावेळी वृत्तपत्रांची संख्या मर्यादित होती. त्यामुळे या वृत्तपत्राने मुंबईतील व्यापारी आणि सुशिक्षित वाचकांमध्ये आपले स्थान निर्माण केले.वाचकांचा वाढता प्रतिसाद आणि बातम्यांची वाढती गरज लक्षात घेऊन १८५० मध्ये या वृत्तपत्राचे दैनिकात रूपांतर करण्यात आले. त्यानंतर १८६१ मध्ये त्याचे नाव बदलून 'द टाइम्स ऑफ इंडिया' असे करण्यात आले. नावातील बदलाबरोबरच वृत्तपत्राच्या कामकाजात आणि बातम्यांच्या स्वरूपातही विस्तार झाला. व्यापारासोबत राजकारण, प्रशासन, शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींना महत्त्व दिले जाऊ लागले.या वृत्तपत्राच्या विकासामध्ये रॉबर्ट नाइट यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी संपादकीय क्षेत्रात काम करताना वृत्तपत्राला अधिक व्यापक आणि प्रभावी स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. पुढील काळात बेनेट, कोलमन अँड कंपनीच्या माध्यमातून या वृत्तपत्राचा विस्तार झाला. १९४६ मध्ये भारतीय उद्योगपती रामकृष्ण डालमिया यांनी या वृत्तपत्र समूहाची मालकी घेतली. भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या उंबरठ्यावर एका महत्त्वाच्या इंग्रजी वृत्तपत्राची मालकी भारतीय उद्योगपतीकडे जाणे ही महत्त्वाची घटना होती.स्वातंत्र्यानंतर देशातील राजकीय, आर्थिक आणि सामाजिक बदलांचे वार्तांकन करण्यामध्ये 'द टाइम्स ऑफ इंडिया'ने महत्त्वाची भूमिका बजावली. निवडणुका, संसद, सरकारी धोरणे, औद्योगिक विकास, शिक्षण, क्रीडा, विज्ञान, मनोरंजन आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी अशा विविध विषयांवरील बातम्या या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होऊ लागल्या. काळानुसार वृत्तपत्राने आपला वाचकवर्गही वाढवला.आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात या वृत्तपत्राने डिजिटल माध्यमांचाही स्वीकार केला. इंटरनेटच्या माध्यमातून संकेतस्थळ आणि मोबाईल ॲपद्वारे बातम्या वाचकांपर्यंत पोहोचवण्यास सुरुवात केली.

कैलाशपती मिश्रा : ज्येष्ठ राजकारणी आणि गुजरातचे माजी राज्यपाल

पुण्यतिथी विशेष

भारतीय राजकारणात अनेक नेत्यांनी संघटनात्मक कार्य, सामाजिक योगदान आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली. कैलाशपती मिश्रा हे अशाच ज्येष्ठ राजकीय नेत्यांपैकी एक होते. भारतीय जनता पक्षाच्या सुरुवातीच्या काळातील महत्त्वाचे नेते म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी बिहारच्या राजकारणात तसेच राष्ट्रीय स्तरावर पक्षसंघटनेच्या उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. गुजरातचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.कैलाशपती मिश्रा यांचा जन्म ५ ऑक्टोबर १९२३ रोजी बिहारमधील बक्सर जिल्ह्यातील दुधारचक येथे झाला. विद्यार्थी दशेपासूनच त्यांना सामाजिक आणि राजकीय कार्याची आवड होती. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या काळात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. याच काळात त्यांच्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचा प्रभाव पडला. पुढे त्यांनी संघटनात्मक कार्याला सुरुवात केली आणि बिहारमध्ये आपले कार्यक्षेत्र विस्तारले.राजकीय प्रवासात त्यांनी भारतीय जनसंघामध्ये सक्रिय भूमिका बजावली. जनसंघाच्या माध्यमातून त्यांनी बिहारमध्ये पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी काम केले. पुढे भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यानंतर ते पक्षाच्या प्रमुख ज्येष्ठ नेत्यांमध्ये गणले जाऊ लागले. बिहारमध्ये भाजपचा विस्तार करण्यासाठी त्यांनी अनेक वर्षे संघटनात्मक काम केले. पक्षातील कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवणे, संघटनात्मक बांधणी करणे आणि राजकीय घडामोडींमध्ये सक्रिय सहभाग घेणे ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये होती.१९७७ मध्ये बिहारमध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले, तेव्हा कैलाशपती मिश्रा यांनी अर्थमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली. राज्याच्या आर्थिक नियोजनाशी संबंधित कामकाजात त्यांनी



सहभाग घेतला. त्यांच्या राजकीय अनुभवामुळे पक्षामध्ये त्यांना विशेष महत्त्व दिले जात होते. ते साधी राहणी आणि संघटनात्मक शिस्त यासाठी ओळखले जात होते.२००३ मध्ये त्यांची गुजरातच्या राज्यपालपदी नियुक्ती झाली. त्यांनी २००४ पर्यंत या पदाची जबाबदारी सांभाळली. त्यानंतर २००४ मध्ये राजस्थानचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी काम पाहिले. तसेच २००७ मध्ये झारखंडच्या राज्यपालपदाची अतिरिक्त जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली होती. विविध राज्यांमध्ये राज्यपाल म्हणून काम करताना त्यांनी घटनात्मक पदाची जबाबदारी पार पाडली.कैलाशपती मिश्रा यांचे निधन ३ नोव्हेंबर २०१२ रोजी बिहारची राजधानी पाटणा येथे झाले. वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय जनता पक्षातील एका ज्येष्ठ आणि अनुभवी नेत्याची कारकीर्द संपुष्टात आली.बिहारमधील जनसंघ आणि भाजपच्या संघटनात्मक उभारणीत कैलाशपती मिश्रा यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. राजकीय कार्यकर्ता, पक्षसंघटक, मंत्री आणि राज्यपाल अशा विविध भूमिका त्यांनी पार पाडल्या. दीर्घ राजकीय कारकिर्दीत त्यांनी पक्षसंघटनेशी असलेली बांधिलकी कायम ठेवली.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

अंजली
होम अप्लायन्सेस सर्व्हिस
प्रो.प्रा दिपक दुस्सा
Mo. 9970256292
7588540906
तत्काळ दुरुस्ती सेवा | चांगल्या प्रतिची हमी | योग्य दरात सेवा | घरी येऊन दुरुस्ती
आमच्या कडे सर्व प्रकारच्या घरगुती वापरातील वस्तु मिक्सर, फॅन,गॅस,गिझर,गॅस शेगडी,भट्टी इतर वस्तु विक्री व दुरुस्ती करुन मिळेल.
अकोलकर कॉम्प्लेक्स, दिवेकर गॅस समोर मालदाड रोड, संगमनेर

संगमनेरात रेशनच्या तांदळात जाळ्या, अळ्या आणि किडे!

दिवाळीच्या तोंडावर निकृष्ट धान्याचा पुरवठा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दिवाळीच्या सणाच्या तोंडावर सर्वसामान्यांच्या घरात आनंदाऐवजी निकृष्ट धान्याचे संकट उभे राहिले आहे. शासनाकडून रेशन दुकानांमार्फत वितरित करण्यात आलेल्या तांदळात चक्क जाळ्या, अळ्या आणि किडे आढळल्याचा धक्कादायक प्रकार संगमनेर तालुक्यातील पठार भागातील साकुर येथे उघडकीस आला आहे. नागरिकांनी तक्रार केल्यानंतर हा प्रकार समोर आल्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याच्या गुणवत्तेचा आणि साठवणुकीच्या प्रक्रियेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

एकीकडे दुष्काळाच्या झळा, वाढती महागाई आणि रोजगाराची अनिश्चितता यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा परिस्थितीत शासनाच्या रेशन व्यवस्थेवर अवलंबून असलेल्या गरीब आणि गरजू कुटुंबांना मिळणाऱ्या धान्याची अवस्था अशी असेल, तर त्यांनी उदरनिर्वाह करायचा तरी कसा? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर रेशन दुकानांमध्ये धान्य घेण्यासाठी लाभार्थ्यांची गर्दी होत आहे. सणासुदीच्या काळात कुटुंबासाठी अन्नधान्याची व्यवस्था करण्याच्या अपेक्षेने नागरिक रेशन दुकानांकडे धाव घेत असताना, त्यांच्या पदरी निकृष्ट दर्जाचे धान्य पडत असल्याचे चित्र समोर आले आहे. तांदळात जाळ्या, अळ्या आणि किडे आढळल्याने हा तांदूळ खाण्यायोग्य आहे की नाही, याबाबत लाभार्थ्यांमध्ये भीती आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. 'आनंदाचा शिधा' मिळणार की नाही, याची चर्चा सुरू असतानाच नियमित रेशनच्या धान्याची ही दयनीय अवस्था समोर आली आहे. गरिबांच्या ताटात दर्जेदार अन्न पोहोचविण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच या घटनेमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गरजू कुटुंबांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्या पदरी निकृष्ट धान्य पडत असेल, तर ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे.

साकुर येथील या प्रकाराची प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची गरज आहे. संबंधित तांदळाची गुणवत्ता तपासून त्याचा पुरवठा कोणत्या गोदामातून झाला, धान्याची साठवणूक योग्य पद्धतीने करण्यात आली होती का आणि वितरणापूर्वी गुणवत्ता तपासणी झाली होती का, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

निकृष्ट धान्याचा पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, लाभार्थ्यांना तातडीने दर्जेदार तांदूळ उपलब्ध करून द्यावा आणि भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

गरिबांच्या हक्काच्या धान्यातच किडे निघत असतील, तर सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचे काय? दिवाळीच्या तोंडावर समोर आलेल्या या प्रकारामुळे प्रशासनाच्या गुणवत्ता नियंत्रण यंत्रणेची कसोटी लागली आहे.

कुंभमेळ्याच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांना सुरक्षा आणि सुविधा सर्वोच प्राधान्याने उपलब्ध करून द्याव्यात- पालकमंत्री

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी- सिंहस्थ कुंभमेळ्याचा प्रारंभ काल ध्वजारोहणाने नाशिक, त्रिंबकेश्वर येथे झाला आहे. येथे येणारा भाविक शिर्डी येथे श्री. साईबाबांच्या दर्शनासाठी येणार असून मोठ्या प्रमाणात भाविकांना सुविधा आणि सुरक्षा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणेने युद्ध पातळीवर कामे पूर्ण करावी तसेच गर्दी नियंत्रण आणि सुरक्षेसाठी कमांड सिस्टीम पोलीस विभागाने कार्यान्वित करण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

शिर्डी येथील श्री साईबाबा मंदिर परिसरातील झिरो सभागृहात कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर विविध विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिर्डी नगरपालिकेच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात ,उपनगराध्यक्ष अभय शेळके, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती , नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री सतिष दिघे ,यांच्यासह शहरातील सर्व नगरसेवक, महावितरण, बांधकाम आणि नगरपालिका विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.



शिर्डी येथील येणारा भाविक तसेच कुंभमेळ्यासाठी नाशिक त्र्यंबकेश्वर येथे भेट देऊन येणारे भाविक शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी येणार असल्याने त्यांना सुविधा प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने प्रशासनास चांगले नियोजन करावे लागणार आहे.प्राधान्याने पार्किंग, दर्शन रांग व्यवस्था,आरोग्य सुविधा पूर्तता करावी लागणार असल्याचे पालकमंत्री विखे पाटील म्हणाले.

श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर आणि नाशिक येथून शिर्डी साठी विशेष इलेक्ट्रिकल वातानुकूलित बसेसची व्यवस्था करण्यात यावी. तसेच दर्शनासाठी होणाऱ्या गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी पोलीस विभागाच्या वतीने २४तास सुरू राहील असा कमांड सिस्टीम किंवा नियंत्रण कक्ष कार्यान्वित करावा, यामध्ये शहरातील विविध महत्वपूर्ण ठिकाणे, चौक, बस स्थानक तसेच रेल्वे स्टेशन ,विमानतळ, मुख्य रस्ते आणि मंदिर परिसराच्या आजूबाजूच्या ठिकाणी गर्दीचे नियंत्रणा बाबतच्या सूचना देण्यासाठी साऊंड आणि सीसीटीव्ही सिस्टिम कार्यान्वित करण्यासाठीचा प्रस्ताव पोलीस प्रशासनाने तात्काळ सादर करावा. तसेच शिर्डी हे वेगाने वाढणाऱ्या शहरात पैकी एक असून या शहराचा विकास हा भविष्यातील नियोजन लक्षात घेऊन करण्याबाबत नगरपालिका,बांधकाम, रस्ते विकास महामंडळ, महावितरण, आणि पाणीपुरवठा व अंतर्गत सुविधा संबंधित असलेल्या सर्व यंत्रणानी भविष्यातील नियोजन लक्षात घेऊन अधिकाधिक सुविधांची उपलब्धता व्हावी यासाठीचे नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी बैठकीत दिले.

भाविकांनी शिर्डी येथे भेट द्यावी व यासाठी विविध समाज माध्यमांचा, रिल्स वापर करण्याबरोबरच येणाऱ्या भाविकांच्या माध्यमातून देखील शिर्डीकडे भाविक आकर्षित होण्याबाबतचे आवाहन श्री साईबाबा संस्थानच्या माध्यमातून करण्यात यावे, सुरक्षा आणि सुविधाला प्राधान्य देत शिर्डीतील भाविकांना सुविधा उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ व प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन बैठकीत पालकमंत्री विखे पाटील यांनी केले. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्वणी काळात शिर्डी येथे येणाऱ्या लाखो भाविकांची शिर्डी आणि परिसरात होणारी गर्दी लक्षात घेता मुख्य महामार्ग व जोडरस्त्यांचे रुंदीकरण जलद गतीने पूर्ण करावे. तसेच भाविकांच्या वाहनांसाठी शहराच्या बाहेर मोकळ्या जागांवर सुसज्ज पार्किंग सुविधा उभारण्यात यावेत.

श्री साईबाबा संस्थानच्या माध्यमातून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सुलभ दर्शन मिळावे, यासाठी दर्शन रांगांचे व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि प्रथमोपचार केंद्रांची उभारणी वेळेत करण्याचे आदेश देण्यात आले. शिर्डीत येणाऱ्या एकाही भाविकाची गैरसोय होणार नाही. सर्व संबंधित विभागांनी आपापसांत समन्वय साधून दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण करावीत. कामाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पालिकेकडून मोठा दिलासा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपरिषदेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सन २०२३-२४ पासून प्रलंबित असलेली थकीत आर्थिक देणी अदा करण्याच्या दृष्टीने नगरपरिषद प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या एकूण १ कोटी ४९ लाख रुपयांच्या थकीत देणींचे धनादेश आज लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई सत्यजित तांबे यांच्या शुभहस्ते वितरित करण्यात आले.



दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली आर्थिक देणी प्राप्त झाल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. आपल्या सेवाकाळात नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी योगदान देणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची प्रलंबित देणी अदा करण्यास प्राधान्य देत प्रशासनाने ही कार्यवाही पूर्ण केली आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हक्कांची पूर्तता करणे ही नगरपरिषदेची महत्त्वाची जबाबदारी असून, त्यांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी नगराध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाकडून सकारात्मक प्रयत्न करण्यात येत आहेत. या निर्णयामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रसंगी नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई सत्यजित तांबे, उपनगराध्यक्ष शेख नूर मोहम्मद पिरमोहमद, मुख्याधिकारी श्री. दयानंद गोरे, सन्माननीय सभापती, नगरसेवक-नगरसेविका तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवेला सन्मान आणि त्यांच्या हक्कांच्या देणींची पूर्तता, हेच नगरपरिषद प्रशासनाचे सकारात्मक पाऊल!

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
हेल्थ इंडिया इन्शुरन्स
FHPL हेल्थ इन्शुरन्स
इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
बजाज आलियांज इन्शुरन्स
एसबीआय जनरल इन्शुरन्स
ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
मेडसेव टीपीए प्रा.लि.
जेनिन्स इंडिया टीपीए लि.
ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
टाटा एआयजी इन्शुरन्स
रिलायन्स जनरल इन्शुरन्स
मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
नॅशनल इन्शुरन्स कं.
न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
युनायटेड हेल्थकेअर लि.
Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
एम.डी.इंडिया हेल्थकेअर
विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग
अतिदक्षता विभाग
अपघात विभाग
डायलिसीस विभाग
सुपर स्पेशालिटी विभाग
न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग
मेडिसीन विभाग
अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट
स्पाईन सर्जरी
मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25